# सोलापूर विद्यापीठ सोलापूर

## परीक्षा विभाग

---

## परिपत्रक क्र. ३ / २०१५

**वाचा:** १. **संदर्भ क्र. सोविसो/परीक्षा/वेळापत्रक/२०१४-१५/१४६१, दि.११ ऑक्टोंबर, २०१४**

२. **संदर्भ क्र. सोविसो/अभ्यासमंडळे/२०१५-१६/४७८०, दि.१९ ऑगस्ट, २०१५**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक/अध्यक्ष व मा.संचालक/विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, **संदर्भ क्र.१** मधील परिपत्रकामध्ये दि.११ जून २०१५ रोजीच्या परीक्षा मंडळच्या ठरावान्वये बदल करण्यात आलेला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून सर्व विद्याशाखांच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रास क्रेडीट ग्रेडींग सिस्टीम प्रणाली (CGPA Pattern) लागू करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ (ऑक्टो/नोव्हें-२०१५) पासून सर्व पदव्युत्तर (पी.जी.) अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षास (विद्यापीठ संलग्नित) निवड आधारित श्रेयांक प्रणाली (Choice Based Credit System) लागू करण्यात आलेली असून सर्व विद्याशाखेच्या अभ्यासक्रमाचा आराखडा (Structure) हे ७०-३० प्रमाणे ठेवण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे CGPA व CBCS प्रणालीमध्ये लेखी परीक्षेच्या स्वरुप एकसारखे असल्याने (७०-३०) परीक्षेच्या दृष्टीकोनातून एकसारखेपणा यावा व विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेता सर्व परीक्षेमध्ये एकसमांतरता असावी. या उद्देशाने **"ऑक्टो/नोव्हें २०१५"** या द्वितीय परीक्षा हंगामापासून **सर्व यु.जी./पी.जी. विद्याशाखांच्या CGPA व CBCS प्रणालीमध्ये ७० गुणाच्या लेखी पेरीक्षेमधील पेपरची वेळ ही एकूण ०२.३० तासाची** असेल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी. **(सदरची बाब अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेतंर्गत अभ्यासक्रमांना लागू नाही)**

सदर, बाब सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक यांनी विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सत्वर निदर्शनास आणावी.

(बी.पी.पाटील)
**परीक्षा नियंत्रक**

**संदर्भ क्रं. : सोविसो/परीक्षा/वेळापत्रक/ऑक्टो-नोव्हें-२०१५/२०१५-१६/७९१** **दिनांक : २५ ऑगस्ट, २०१५**